## प्रकरण तीन

## चित्रपटाचे आशय

१९१९ ते १९४९ हे कोल्हापूर संस्थानच्या इतिहासातील अंतीम पर्व अनेक दृष्टीनी महत्वाचे ठरते. सामाजिक दृष्टीकोनातून या काळात ब्राम्हणेतर चळवळीनी व्याप्ती वाढविली. सामाजिक चळवळ फक्त उच्च वर्णियांपुरतीच मर्यादित न रहाता, मागासवर्गीयांनाही आपल्या हक्कांची जाणीव झाली. आपल्यावर होणा-या परंपरागत अन्यायाविरुध्द त्यांनी चळवळ सुरु केली. राजकीय दृष्टीकोनातून प्रजासत्ताक परिषदेमध्ये राजकीय हक्क व स्वातंत्र्याकरिता चळवळ उभारली. उद्योगधंद्यात वाढ व विकास झाल्याने आर्थिक जीवन उंचावले. याच काळात एक करमणुकीचे माध्यम म्हणून चित्रपट व्यवसाय उभा राहिला. वाङ्‌मय हा जीवनाचा आरसा आहे, असे म्हटले जाते, चित्रपटाविषयी सुध्दा असे म्हणता येईल का ? झपाट्याने बदलत जाणारे आर्थिक, सामाजिक, राजकिय जीवनाचे प्रतिबिंब चित्रपटात पडले होते का ? याचा विचार होणे आवश्यक ठरते. कोणता आशय घेऊन चित्रपट निघाले आणि ते किती अंशी वास्तववादी होते, याचा अभ्यास करण्यासाठी या काळात निर्माण झालेल्या चित्रपटांच्या आशयाचा एकत्रितपणे अभ्यास करणे आवश्यक आहे. मागच्या प्रकरणामध्ये १९१९ ते १९४९ या काळात मूकपट, बोलपट होऊन जवळजवळ चौ-याहत्तर चित्रपट कोल्हापूरात निर्माण झाले. त्यांची धार्मिक चित्रपट, सामाजिक चित्रपट, ऐतिहासिक चित्रपट अशी वर्गवारी करता येते.

### धार्मिक चित्रपट :

धार्मिक आशय असणा-या चित्रपटात, पौराणिक चित्रपट व संतपट

असे दोन भाग करता येतात. पौराणिक चित्रपट १९१९ ते १९४० याच कालखंडात निघाले व त्यांची संख्या सत्तावीस होती. इतक्या मोठया संख्येने पौराणिक चित्रपटांची निर्मिती झाल्याची माहिती व १९१९ ते १९४९ या काळात तीन संतपटांची निर्मिती झाल्याची माहिती उपलब्ध संदर्भ साधनातून मिळते. प्रारंभीच्या काळी जनमानसावर धार्मिक विषयांचा पगडा जास्त असल्यामुळे व चमत्कृती दृश्यांना जास्त वाव असल्यामुळे पौराणिक चित्रपट अधिक निघाले असावेत, असा निष्कर्ष काढता येतो.

## पौराणिक चित्रपट :

पौराणिक चित्रपटात देखील महाभारतातील कथांवर सर्वात अधिक चित्रपटांची निर्मिती झाली, तर महाभारतातही कृष्ण या व्यक्तिरेखेवर सर्वात जास्त चित्रपट निघाले. महाभारतातील कथांवर आधारीत चौदा चित्रपटांपैकी अकरा कृष्ण या व्यक्तिरेखेवर चित्रित करण्यात आले. श्रीकृष्णाने बलराम कन्या वत्सला व अर्जुन पुत्र अभिमन्यु यांच्या विवाहास जी मदत केली, त्या महाभारतातील कथेवर चार चित्रपटांची निर्मिती झाली. " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२१ साली " वत्सला हरण " या चित्रपटाची निर्मिती केली, तर १९२७ साली याच विषयावर " माया बाजार " हा चित्रपट याच चित्रपट संस्थेने सादर केला.[१] " अभिमन्यु व वत्सला " या दोघांना विवाहबध्द व्हायचे असते. श्रीकृष्णाचीही तशीच इच्छा असते, पण वत्सलेचा विवाह बलराम दुर्योधन पुत्र लक्ष्मण याच्याशी निश्चित करतो, अशा वेळी कृष्ण व नारद यांच्याशी संधान बांधून भीमपुत्र घटोत्कच आपल्या मायावी शक्तीने मायाबार भरवितो. या गोंधळात वत्सलेचे हरण करून अभिमन्यु व वत्सला यांचा विवाह घडवून आणतो. याच पौराणिक कथेवर आधारीत " पार्थकुमार " हा चित्रपट " श्याम सिनेटोन " ने १९३४ साली व " माया बाजार " हा चित्रपट १९३९ साली " प्रभा चित्र " ने निर्मित केला.[२]

कृष्णाचे बालपण, त्याच्या बाललीला व बालपणातील पराक्रम या विषयांवर आधारीत चार चित्रपट तयार झाले. " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२३ साली " कृष्णावतार " व १९२७ साली " मुरलीवाला " या दोन चित्रपटांची निर्मिती केली.[३] " कृष्णावतार " चे कथानक संदर्भ साधनात नसले तरी हा चित्रपट शिर्षकावरून कृष्ण जन्म व त्याच्या बालपणावर आधारित असावा, असा निष्कर्ष काढता येतो. " मुरलीवाला " चित्रपटात बालकृष्ण, त्याचे सवंगडी, कृष्णावरील राधेची भक्ती व त्यामुळे राधा व तिचा पती अनय यांच्यातील संघर्ष, या गोष्टीचे चित्रण या चित्रपटात करण्यात आले. श्री. वरेरकर या सुप्रसिध्द नाटककाराचे " कुंजविहारी " हे कृष्णावरील नाटक पाहून बाबूराव पेंटर यांना बालकृष्णावरील चित्रपट काढण्याची इच्छा झाली व त्या इच्छेची पुर्तता त्यांनी " मुरलीवाला " या चित्रपटाद्वारे केली.[४] " प्रभात फिल्म कंपनी " ने १९२९ साली निर्मिती केलेल्या " गोपालकृष्ण " या चित्रपटाचे कथानकही श्रीकृष्णाच्या लहानपणीच्या पराक्रमावर आधारीत घेण्यात आले. गोकुळात देवांचा राजा इंद्र याच्या कोपामुळे जलप्रलय होतो व श्रीकृष्ण गोवर्धन पर्वत आपल्या करंगळीवर उचलून, गोकुळातील प्रजेचे रक्षण करतो, या आशयाचे कथानक या चित्रपटात घेतले गेले.[५] १९३५ साली " कोल्हापूर सिनेटोन " ने " कालिया मर्दन " हा चित्रपट सादर केला.[६] हा चित्रपट बालकृष्णाने कालासूर कालियाच्या केलेल्या वधाचे कथानक घेऊन तयार केला. यमुना नदीत कालिया वास्तव्य करीत असतो. कालिया आपल्या शरीरातील विषाच्या सहाय्याने कृष्णाला ठार मारावयाचे ठरवितो. त्याच्या जहाल विषाने यमुनेतील पाणी व आजू-बाजूच्या निसर्गावरही वाईट परिणाम होऊ लागतो. परंतु कृष्ण सामर्थ्यापुढे कालियाची शक्ती कमी पडते व कृष्ण-कालिया यांच्या द्वंद युध्द होऊन कालिया मारला जातो.[७] अशा रितीने दुष्टांच्या नाशाचे प्रतिक दर्शविणारे कथानक निवडून हा चित्रपट चित्रित केला गेला.

महाभारतातील " कर्ण " या व्यक्तिरेखेवर व कौरव - पांडव यांचे युध्दात कृष्णाने दिलेल्या उपदेशावर"महारथी कर्ण" हा चित्रपट " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२८ साली सादर केला.[८] महाभारतातील कौरव पांडव यांचे युध्द व अर्जुनास श्रीकृष्णाने केलेला उपदेश याच विषयावर " कुरुक्षेत्र " हा चित्रपट " छत्रपती सिनेटोन " ने १९३३ साली सादर केला. यात कौरव व पांडव यांच्यातील १८ दिवस चाललेल्या युध्दाचे रोमांचकारी चित्रण केले होते.[९] " आकाशवाणी " कंस वधावरील चित्रपट " कोल्हापूर सिनेटोन " ने १९३४ साली निर्मिला. कंसाच्या उद्दाम राज्य कारभारास प्रजा कंटाळली होती. कंसाच्या बहिणीचा विवाह वासुदेवाशी झाला होता व त्यांच्या आठव्या पुत्राकडून कंसाचा वध होणार, ही आकाशवाणी झाली होती, म्हणून कंसाने वासुदेव व देवकी यांना तुरुंगात टाकले, पण त्यांचा आठवा पुत्र कृष्ण गोकुळात नंद, यशोदेकडे सुरक्षित राहिला. अखेर कंसाचा वध करुन कृष्णाने आकाशवाणी खरी ठरविली.[१०] अशा रितीने सुष्टांचा दुष्टांवरील विजय या चित्रपटात चित्रित करण्यात आला. कृष्णाच्याच व्यक्तिरेखेवरील " उषा " हा पौराणिक चित्रपट " शालिनी सिनेटोनने " १९३५ साली प्रस्तुत केला. " द्वापारयुगातील "[११] कथेवरील या चित्रपटाचा आशय असा होता की, शोणितपुरचा राजा बाणासूर हा शिवभक्त असतो. शंकराच्या भक्तीने प्राप्त झालेल्या सामर्थ्याच्या जोरावर तो विष्णुभक्तांचा छळ करत असतो. अशा वेळी श्रीकृष्ण आपल्या बुध्दीचातुर्याने बाणासुराची कन्या उषा व आपला नातू अनिरुध्द यांचा विवाह घडवून आणतो. विष्णु व शिव ही एकाच शक्तीची वेगवेगळी रुपे आहेत हे तो पटवून देतो.[१२]

पौराणिक चित्रपटांच्या शृंखलेतील महाभारतावरील दोन चित्रपट कीचकवधाच्या एकाच कथानकावर निर्मित करण्यात आले. " महाराष्ट्र फिल्म कंपनी " चा " सैरंध्री " हा चित्रपट १९१९ साली निर्मित झाला.[१३]

व हेच कथानक असणारा याच नावाचा रंगीत बोलपट " प्रभात फिल्म कंपनी " ने १९३३ साली सादर केला व त्याचा आशय पांडवांच्या अज्ञातवासात त्यांना विराट देशाचा आश्रय घ्यावा लागतो. द्रौपदीला दासी व्हावे लागते. या काळात तेथील सेनापती कीचक हा द्रौपदीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो. त्याचवेळी भीम तेथे येऊन कीचकाचा वध करतो.[१४] " महाराष्ट्र फिल्म कंपनी " चा मूकपट असल्याने " सैरंध्री " च्या तोंडी असलेल्या वाक्याची पाटी [टायटल] " पर सेवा आदमीको कितनी लाचार बनाती है " अशी होती.[१५] इतका महत्वाचा विचार प्रस्तुत करणाचे काम कोल्हापूरात निर्मिलेल्या पहिल्या चित्रपटाने केले.

कोल्हापूरात निघालेल्या पौराणिक चित्रपटात रामायणावर आधारीत तीन चित्रपटांची निर्मिती झाली. " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९३० साली निर्मिलेल्या या कंपनीने " लंका " या चित्रपटाची निर्मिती केली.[१६] चित्रपटाची कथा संदर्भ साधनात उपलब्ध नसली तरी चित्रपटाच्या शिर्षकावरून रावणाची राजधानी लंकेमध्ये घडलेल्या घटनांवर सदर चित्रपट असावा, असा निष्कर्ष निघतो.

१९३१ साली " प्रभात फिल्म कंपनी " ने " चंद्रसेना " हा चित्रपट सादर केला. पाताळ लोकांतील नागराज कन्या " चंद्रसेना " ही रामभक्त असते. तिचा विवाह " मही " या अहीराजाच्या भावाशी निश्चित होतो. राम - रावण यांच्या युध्दात रावण अही-महीकडे मदत मागण्यासाठी निरोप पाठवितो. ते दोघे राम - लक्ष्मणाला कपटाने पाताळ लोकात आणून बळी देण्याचे ठरवितात. राम लक्ष्मणाचे महीशी घनघोर युध्द होते व मारुती चंद्रसेनेकडे जाऊन महीच्या मरणाचे रहस्य जाणून घेतो त्यामुळे अही - महीचा मृत्यु होतो.[१७]

" अयोध्येची राणी " हा रामायणातील एका कथेवर आधारीत चित्रपट १९४० साली " प्रगती पिक्चर्स " ने निर्मित केला. कैकयीला दशरथ राजाने दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी राम चौदा वर्षे वनवास पत्करतो. भरत या कैकयी पुत्राला मातेचे हे कारस्थान रूचत नाही, तो वनात जाऊन रामाचा शोध घेतो व रामाला परत चलण्याची विनंती करतो, पण राम त्याची समजूत घालून त्यास परत पाठवितो. रामाची आज्ञा मानून भरत राज्य कारभार पाहू लागतो, पण रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून राज्य कारभार करतो. [१८]

पौराणिक कथांच्या आधारावर तयार केलेल्या चित्रपटात दोन चित्रपट " ध्रुव " या पौराणिक व्यक्तिरेखेवर निर्मित करण्यात आले. १९३८ साली " प्रभा चित्र " या चित्रपट संस्थेने ध्रुव हा चित्रपट काढला. [१९] त्याच वर्षी " शालिनी सिनेटोन " ने " ध्रुवकुमार " हा चित्रपट सादर केला. उत्तानपाद या राजाच्या सुनिती व सुरूची या दोन राण्या होत्या. सुनितीचा पुत्र ध्रुव व सुरूचीचा पुत्र उत्तम हा असतो. ध्रुवाची सावत्र आई त्याचा मत्सर करीत असते. ती एकदा ध्रुवाला राजाच्या मांडीवरून लाथेने ढकलून देते. ध्रुव हा अरण्यात तपश्चर्येला जातो व तपस्या करून आकाशात ध्रुवतारा म्हणून " अढळपद " मिळवितो. अशी कथा वरील दोन्ही चित्रपटात असल्याचा उल्लेख " चित्र शारदा " या अंकात मिळतो. घोर तपस्येमुळे मिळणारे फलित या चित्रपटाद्वारे दाखविण्यात आले. [२०]

" महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२६ साली " गजगौरी " व " भक्त प्रल्हाद " व १९२७ साली " सती सावित्री " या चित्रपटांची निर्मिती केली. [२१] या चित्रपट कथांचा उल्लेख तात्कालिन संदर्भ साधनात उपलब्ध नसला तरीदेखील चित्रपटाच्या नावावरून त्या प्रचलित पौराणिक कथा असाव्यात, असा निष्कर्ष काढता येतो.

गौरी म्हणजेच पार्वती स्नान करीत असताना कोणी येऊ नये म्हणून तिने आपल्या अंगावरील मळाच्या गोळ्याला मुलाचा आकार देवून त्यात प्राण ओतले. शंकर तपश्चर्येहून परत आल्यावर त्या मुलाने त्यांना अडविल्यामुळे शंकराने त्याचा शिरच्छेद केला. स्नान करून परत आलेल्या पार्वतीने त्याला जिवंत करण्याचा हट्ट धरला, त्यामुळे मरण जवळ आलेल्या हत्तीला ठार करून त्याचे शिर त्या मुलाला बसविले व त्याला जिवंत केले. ही कथा " गजगौरी " या नावाने प्रचलित आहे.

त्याचप्रमाणे " भक्त प्रल्हाद " या विष्णुभक्त मुलाची कथादेखील पौराणिक आहे. हिरण्यकश्यपू या राजाचा पुत्र प्रल्हाद विष्णु भक्त असतो. प्रल्हादाच्या पित्याला ही भक्ती अजिबात आवडत नसते. ते प्रल्हादावर अनेक अत्याचार करतात. अनेक प्रकारे छळ करतात. अशा वेळी अखेर विष्णु नरसिंह रुपात एका खांबातून प्रकट होतो व हिरण्यकश्यपूचा वध करतो.

" सती सावित्री " या कथेत सावित्री ही आपला पती सत्यवानाचे प्राण यमाकडून पुन्हा आणते व त्यास जिवंत करते, अशी प्रचलित पौराणिक कथा आहे.

" राजा हरिश्चंद्र " च्या जीवनावरील " अयोध्येचा राजा " हा " प्रभात फिल्म कंपनीचा " पहिला बोलपट १९३२ साली प्रदर्शित झाला. [२२] राजा हरिश्चंद्र या सत्यवचनी राजाची परीक्षा पाहण्यासाठी विश्वामित्र ऋषी दक्षिणा म्हणून त्याच्या सिंहासनाची मागणी करतात. राजा व त्याची राणी तारामती राजत्याग करून पुढे काशी येथे जाऊन हलकी सलकी कामे करतात. गंगानाथ सावकार तारामतीला लिलावात विकत घेतो. रोहिदास आपल्या आईच्या सुटकेसाठी जातो व गंगानाथाकडून ठार होतो. पण तो आरोप तारामतीवर येऊन तिला शिरच्छेदाची शिक्षा होते. शिक्षेची

अंमलबजावणी करण्याचे काम हरिश्चंद्रावर सोपवले जाते. अशावेळी शंकर प्रकट होऊन तारामतीला वाचवितात. विश्वामित्र ऋषी प्रसन्न होऊन हरिश्चंद्राचे राज्य त्याला परत देतात. अशा रितीने सत्यवचनी राजाच्या खरेपणाचे फळ चांगलेच मिळते हे या चित्रपटाने लोकांसमोर मांडले.[२३]

पौराणिक कथातील मच्छिंद्रनाथांची महती सांगणारे पौराणिक कथानक १९३२ सालच्या " प्रभात फिल्म कंपनी " च्या " माया मच्छिंद्र " या चित्रपटासाठी निवडण्यात आले.[२४] किलोत्तमा [तिलोत्तमा] ही कामरुप देशाची राणी पुरुषद्वेष्टी असते. हे पाहून माया मच्छिंद्र कामरुप देशात जातात. तेंव्हा अचेतन वस्तूवरही प्रभुत्व गाजविण्याचे त्याचे सामर्थ्य पाहून राणी त्यांना शरण जाते. मच्छिंद्रनाथांचा शिष्य गोरखनाथ याला नंतर कळून चुकते की, " मच्छिंद्रनाथ " कोठून आले किंवा कोठे गेले नाहीत, तर तो केवळ मायेचा प्रभाव होता.[२५]

१९३५ साली " सम्राट सिनेटोन " ने काढलेल्या " नागानंद " या चित्रपटातील कथेचा आशय नागवासिय लोकांच्या विष्णुवाहन गरुडावरील विश्वासामुळे ते त्याला रोज एका माणसाचा बळी देतात. " जीमुथवन " राजा एका बाईच्या मुलाचे प्राण वाचावेत म्हणून स्वत: बळी जाण्याचे ठरवितो. गरुडाने त्याला खाल्यावर आपली चूक गरुडाला कळते व तो अमृत आणून त्याला जिवंत करतो.[२६]

" गंगावतरण " हा हिमालय कन्या गंगा हिच्या पौराणिक कथेवरील चित्रपट " कोल्हापूर सिनेटोन " ने १९३७ साली सादर केला. हिमालयाची कन्या गंगा ही मानव जातीच्या कल्याणासाठी अभोगीच जीवन जगते. कपील मुनींचा समाधीभंग केल्याबद्दल सगर राजाच्या सहस्त्र पुत्रांना भस्मसात करतात. सगरचा नातू भगिरथ आपल्या घोर तपश्चर्येने गंगेला शिवाच्या जटातून पृथ्वीतलावर आणतो.[२७] या चित्रपटातही पूर्व चित्रपटाप्रमाणे तपश्चर्येमुळे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मिळणारे फळ दाखविण्यात आले.

१९१९ ते १९४० या काळात कोल्हापुरात निर्माण झालेल्या पौराणिक चित्रपटातील शेवटचा चित्रपट " मोहिनी " १९४० " माय पिक्चर्स " ने सादर केला.[२८] " मोहिनी " या अप्सरेवरील हा चित्रपट होता. अप्सरेची प्रमुख मोहिनी विदेशाचा राजा रुक्मगंधा याला मोहित करून दोन वचने त्याच्याकडून घेते. एकतर राजाने राजपुत्राला ठार करायचे किंवा एकादशीचा उपवास मोडायचा.[२९]

संतपट :

कोल्हापूरात १९१९ ते १९४९ या काळात निघालेल्या तीन संतपटापैकी दोन संतपट हे " दामाजी " या व्यक्तिरेखेवर आधारीत होते.

१९२२ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने दामाजी या चित्रपटाची निर्मिती केली.[३०] विठ्ठलभक्त दामाजी गावातील भिषण परिस्थिती निर्माण झाल्यावर गरीबांसाठी धान्याची कोठारे उघडून देतो. कावेबाज मुजूमदार त्याच्याविरुध्द कट करतो, पण विठोबा महाराजाचं रूप घेऊन त्याची सुटका करतो.[३१] गरीबांना दयेने व माणुसकीने वागविणे, हाच खरा मानवधर्म आहे, हा संदेश या चित्रपटाद्वारे दिला गेला. याच कथानकावर आधारित " भक्त दामाजी " या नावाचा चित्रपट " न्यू हंस पिक्चर्स " ने १९४२ साली सादर केला.[३२]

" कान्होपात्रा " हा संतपट १९३७ साली " शालिनी सिनेटोन " ने सादर केला. विठ्ठलभक्त कान्होपात्रावर धनिकपुत्राच्या खुनाचा आरोप होतो. हा खुन एका सरदाराने केलेला असतो. अखेर कान्होपात्रा निर्दोष ठरते व विठ्ठलाच्या चरणी लीन होते.[३३] या संत कथेवर चित्रपट चित्रित केला गेला.

## सामाजिक चित्रपट :

सामाजिक चित्रपटात विविध सामाजिक विषय व समस्यांनुसार चित्रपटांची वर्गवारी करता येते. विवाह व वैवाहिक समस्या हाताळणारे चित्रपट, शेतकरी व गरीब लोकांची पिळवणूक दाखविणारे चित्रपट, कुमारी मातांचे प्रश्न मांडणारे चित्रपट, कामगारांच्या प्रश्नांवरील चित्रपट, कौटुंबिक समस्या दर्शविणारे चित्रपट, अशी वर्गवारी करता येते. १९१९ - १९४९ या काळात कोल्हापूरात निघालेल्या सामाजिक चित्रपटांची संख्या एकोणीस आहे. सर्वाधिक चित्रपट विवाह व वैवाहिक जीवन या विषयाला अनुसरून निर्मिले गेले.

## विवाह व वैवाहिक जीवनावरील चित्रपट :

" प्रेमवीर " हा चित्रपट " हंस पिक्चर्स " ने १९३७ साली प्रस्तुत केला.[३४] या चित्रपटात महाविद्यालयीन कन्या " पुतळी " हिचे प्रेम संपादन करण्यात " प्रितम " यशस्वी होतो. पण काकांनी आर्थिक मदत बंद केल्यामुळे मित्राकडे राहू लागतो. पुतळीचा विवाह तिचे वडील एका कायदे पंडीताशी निश्चित करतात, पण त्यांचा हा प्रयत्न यशस्वी होवू शकत नाही.[३५] विवाह याच विषयावरील " ब्रम्हचारी " हा चित्रपट १९३८ साली " हंस पिक्चर्स " ने विनोदी शैलीत प्रस्तुत केला.[३६] ब्रम्हचारी राहण्याची शपथ घेतलेला " औदुंबर " हा तरुण वडीलांनी ठरविलेल्या मुलीशी विवाह करण्यास नकार देतो व घराबाहेर पडून पोट भरण्यासाठी हलकीसलकी कामे करु लागतो. पण पुढे त्याच मुलीच्या प्रेमात पडून आपण केलेल्या प्रतिज्ञेचा भंग करतो.[३७]

" हंस पिक्चर्स " ने १९३९ साली " देवता " या चित्रपटाद्वारे एका तरुणीचा विधुराशी विवाह झाल्याने निर्माण होणारे प्रश्न मांडले गेले.

" सुशिला " हा आपला धाकटा भाऊ व बहिण यांचा एकमेव आधार असते. ती दासोपंत या विधुराशी विवाह करते. तिने विवाह करू नये म्हणून तिचा सावत्र मुलगा प्रा. अशोक अनेक प्रयत्न करतो, पण ते निष्फळ ठरतात. त्याने तिला महाविद्यालयीन वसतिगृहात आश्रय दिलेला असतो. तिला घालवून देण्याचे त्याच्यावर दडपण येते, आपल्यामुळे आलेल्या संशयाचे सुशीला निराकरण करून सुशिला निघून जाते, पण तिला शोधून काढतात. [३८]

" हंस पिक्चर्स " चा " सुखाचा शोध " १९३९ सालचा चित्रपट वैवाहिक जीवनातील समस्येवर चित्रित करण्यात आला. [३९] आनंद हा एक जबाबदार व परोपकारी मुलगा असतो. तो एका विधवेला आत्महत्या करण्यापासून परावृत्त करतो. आई व भावाने पसंत केलेल्या मुलीशी तो विवाहबध्द होतो, पण त्याच्यावर एकावर एक संकटे येतात. परपुरुषाच्या नादी लागलेल्या आपल्या पत्नीला सोडून तो एका अभिनेत्रीच्या नादी लागतो. त्याला हवे असणारे सुख शेवटी गरीबांच्या झोपडीत मिळते. अशा आशयाचे कथानक या चित्रपटात होते. [४०]

१९४० साली " हंस पिक्चर्स " ने निर्मित केलेल्या " अर्धांगी " चित्रपट वैवाहिक जीवनातील समस्यांवर आधारित होता. आधुनिक विचारांची पत्नी असावी, असे वाटणारा पती आपल्या पत्नीला इंग्रजी शिकविण्यात अयशस्वी होतो व एका तत्ववेत्याच्या आधुनिक विचारांच्या पत्नीच्या प्रेमात पडतो, पण हा सर्व भ्रमका व दिखाऊपणा आहे, हे त्याच्या लक्षात येताच तो परत घरी येतो. अशा रितीने खोटया कल्पना उराशी बाळगल्याने होणारे नुकसान दाखविण्याचा स्तुत्य प्रयत्न यात केला आहे. [४१]

वैवाहिक जीवनातील अपत्य सुखाचे महत्व विशद करणारा " पहिला पाळणा " हा चित्रपट " न्यू हंस पिक्चर्स " ने १९४२ साली निर्मित केला.

चित्रा या तरुणीच्या मुलाची आवड नसल्याने मूल होऊ न देण्याच्या अटीवर ती धनंजयशी विवाहबध्द होते. मात्र लग्नानंतर धनंजयाच्या घरात लहान मुलांविषयी असणारे प्रेम पाहून तिचेही मन परिवर्तन होते व तिला लहान मुलांविषयी आस्था वाटू लागते. तिला बाळ होते व ती स्वतःच्या व इतरांच्या मुलांवर प्रेम करू लागते.[४२]

वैवाहिक जीवनातील व्यावहारिक बाजूवर प्रकाश टाकणारा चित्रपट " चिमुकला संसार " या नांवाखाली १९४३ ला " प्रफुल्ल पिक्चर्स " ने सादर केला.[४३] नंदा व विश्वास या महाविद्यालयीन युवक युवतीचा प्रेमविवाह होतो, पण लग्नानंतर संसार करणे किती कठीण आहे, हे त्यांच्या लक्षात येते. विश्वासला कोठे नोकरी मिळत नाही. अशातच त्यांना पुत्रप्राप्ती होते व या प्रफुल्लच्या जन्मानंतर मात्र त्यांच्या चिमुकल्या संसाराचे बस्तान बसते.[४४]

" प्रभाकर पिक्चर्स " ने १९४६ ला " सासुरवास " हा चित्रपट प्रस्तुत केला.[४५] याचे कथानक जहागिरदार पुत्र हिंदुराव व त्यांची पत्नी रत्ना यांच्या वैवाहिक जीवनात उद्‌भवलेल्या एका संकटावर आधारित निवडण्यात आले. हिंदुराव शीलाच्या स्वभावावर खुश होऊन तिच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतो, अशावेळी रत्ना झुंझाररावाकडे, म्हणजेच आपल्या सासऱ्याकडे फिर्याद घेऊन जाते. तेंव्हा झुंझारराव हिंदुरावाचे शिलाशी लग्न न होऊ देता मुलगा व सून यांच्याकडे झुंझारगडला जाऊन रहातो.[४६]

कुमारी मातांच्या समस्या मांडणारे चित्रपट :

कुमारी मातांच्या सामाजिक प्रश्नावर कोल्हापुरात निर्माण झालेल्या दोन चित्रपटातील " विलासी ईश्वर " हा पहिला चित्रपट १९३५ साली " शालिनी सिनेटोन " ने सादर केला.[४७] शमा नावाच्या नर्तिकेवर

एका जहागिरदार पुत्राचे प्रेम बसते. तो तिला लग्न करण्याचे वचनही देतो, पण जेंव्हा ती गर्भवती होते तेंव्हा वचनभंग करतो. शमाही आपल्या बाळाचे नांव " नंदू " असे ठेवते व स्वतः:च्या हिंमतीवर त्याला मोठे करते. पुढे विलास हा ईश्वर असे नांव बदलून राजकन्येशी विवाह करू पहातो. पण तिचे प्रेम शमाचा भाऊ संजीव याच्यावर असते व शेवटी ती संजीवचाच स्विकार करते.[४८] याच विषयावरील दुसरा चित्रपट " प्रफुल्ल पिक्चर्स " ने " माझे बाळ " या नांवाने १९४३ साली प्रस्तुत केला.[४९] शशीचे रवीवर प्रेम असते. पण तो मात्र तिच्याशी प्रेमाचे नाटक करून फसवितो. त्यामुळे निराधार झालेली शशी आपल्या मुलीला अनाथश्रमात ठेवते व एका इस्पितळात नर्सची नोकरी करते. या इस्पितळात " मनोहर " शशीच्या शुश्रुषेने बरा होतो. नंतर शशी व मनोहर विवाहबध्द होतात व नंतर शशी आपल्या मुलीला शकुला घरी आणते. पण अनाथाश्रमात उद्‌भवलेल्या एका घटनेमुळे मनोहर तिला परत आश्रमात पाठविण्यास भाग पाडतो. पण नंतर त्याचे मन परिवर्तन होऊन शकुलाही तो " माझे बाळ " म्हणून स्विकार करतो.[५०]

## आर्थिक शोषणाचे दर्शन घडविणारे चित्रपट :

ग्रामीण पार्श्वभूमीवरील शेतक-यांवर सावकाराकडून होणा-या अन्यायावरील कथेवर आधारित " सावकारी पाश " या चित्रपटाची निर्मिती " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२५ साली केली.[५१] पूर्वीच्या काळी सावकार गरीब शेतक-यांना लुटत असत, त्यांच्यावर अन्याय करीत असत. एका सुखी शेतकरी कुटुंबातील " अन्याबा " नावाचा शेतकरी आपल्या मुलाच्या लग्नासाठी सावकाराकडून कर्ज घेतो. सावकार या कुटुंबावर कर्ज वसूल करण्यासाठी अनेक अत्याचार करतो. त्यामुळे अन्याबाचा मृत्यू होऊन त्याच्या मुलालाही तुरूंगवास पत्करावा लागतो व यातून त्या खेडेगावात

सावकाराच्या विरुध्द जागृति होण्यास सुरुवात होते. याच कथेवरील व हेच नांव असणारा बोलपट " शालिनी सिनेटोन " ने १९३६ साली प्रस्तुत केला. [५२]

गाव प्रमुखाकडून गावातील शेतकरी व गरीब लोक यांच्यावर अत्याचार होत असतो, पण शेवटी त्या अत्याचाराचा प्रतिकार केला जातो, अशा आशयाचे कथानक असणारा " खूनी खंजीर " चित्रपट " प्रभात फिल्म कंपनी " ने १९३० साली प्रस्तुत केला. याच आशयाचे कथानक असणारा " जुलूम " हा चित्रपट याच संस्थेने १९३१ साली सादर केला. [५३]

" नवहंस पिक्चर्स " ने " पैसा बोलतो आहे " हा चित्रपट १९४३ साली निर्मिला. [५४] बापूजी या लेत गिरणीच्या एजंटाची कथा असणारा चित्रपट होता. बापूजी पैसा मिळवण्यासाठी कोणतेही मार्ग अवलंबतो, पण त्याची मुलगी त्याच्या विरुध्द स्वभावाची असते. लालानाथ हा दुस-या एका संस्थेचा अधिकारी कोणत्यातरी निमित्ताने तिच्याजवळ येतो व शेवटी बापूजीचे सर्व भलेबुरे धंदे उघड करण्यात यश मिळवितो. [५५]

## सुधारणावादी चित्रपट :

दारुबंदीचा संदेश देणारा " ब्रँण्डीची बाटली " हा चित्रपट " हंस पिक्चर्स " ने १९३९ ला काढला. [५६] बगाराम या नगरपालिकेतील कारकुनाची कथा असणा-या चित्रपटात बगाराम हा दारुबंदीच्या मोहिमेत उतरतो. वरिष्ठ अधिका-याच्या मुलीच्या प्रेमात तो पडतो. तिच्या धाकट्या भावाला वाचविण्यासाठी ब्रँण्डीची गरज तो अनेक युक्त्या करुन पूर्ण करतो. [५७]

" प्रभाकर पिक्चर्स " ने १९४७ साली " मीठ भाकर " हा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कौटुंबिक कथेवर आधारित सामाजिक आशय असणारा चित्रपट निर्मित केला. तात्याबांच्या तीन मुलांपैकी अमृत हा मुलगा जुगारी अड्यावर काम करतो. त्याच्यावर खुनाचा आळ येतो. त्याची शिक्षा वाचविण्यासाठी सर्व कुटुंबाने माझ्याकडे कामाला राहिले पाहिजे, असे अड्याचा मालक सांगतो, पण प्रत्यक्षात ज्याच्या खुनाचा अमृतवर आरोप असतो, तो माणूस जिवंतच असतो, अशा रितीने सर्व प्रकरणाचा शेवट गोड होतो. या आशयाचे कथानक " मीठ भाकर " चित्रपटात घेतले गेले. [५८] अंतीम विजय सत्याचाच असतो, याची प्रचिती या चित्रपटाद्वारे येते.

## कामगारांच्या प्रश्नांवरील चित्रपट :

कामगार व भांडवलदार यांच्यातील संबंधावर प्रकाश टाकणारा चित्रपट " गजाभाऊ " या नांवाने " प्रफुल्ल पिक्चर्स " ने १९४४ साली काढला. या चित्रपटाचा आशय रंगूनमधील बॉम्बींगमधून गजाभाऊ आपल्या मुलीसह निसटतात, पण त्यांची ताटातूट होते. पुढे ते साखरवाडीत नोकरी धरतात. जिथे त्यांची शांतीशी गाठ पडते. मुंबईच्या एका मिलमध्ये संप घडवून आणण्यासाठी ते मुंबईला जातात. रत्नाकांत संप मिटविण्याचा प्रयत्न करतो, पण गजाभाऊंना अटक होऊन परिस्थिती अधिकच गंभीर होते. पुढे सगळे प्रकरण मिटून गजाभाऊंची आपली मुलगी समित्रा बरोबर भेट होते, असा होतो. [५९]

## परंपरागत संघर्षावरील चित्रपट :

ग्रामीण पार्श्वभूमीवरील " मंगल चित्र " च्या १९४७ साली निघालेल्या " जय मल्हार " या चित्रपटात पाटील व बेरट यांच्यातील

परंपरागत संघर्षाची कथा चित्रित करण्यात आली होती.[६०] दौलतराव पाटील कल्लू बेरडाच्या बापाचा खून करतो व आपल्या वडिलांच्या खुनाचा बदला घेतो. कल्लू बेरड दौलतराव पाटलाला ठार मारण्याची प्रतिज्ञा करतो पण शेवटी दोघेही एकमेकांच्या वाराने मारले जाऊन त्यांच्या वैराचा शेवट होतो.[६१]

ऐतिहासिक चित्रपट :

ऐतिहासिक विषयावरील चित्रपटात देखील इतिहासातील घटनांवर आधारीत चित्रपट व काल्पनिक ऐतिहासिक घटनांवरील चित्रपट असे दोन विभाग पडतात. ब्रिटीश सरकारच्या विरुध्द चीड निर्माण करणारे चित्रपट मंजूर होणे, तात्कालीन परिस्थितीत अवघड असल्याने चित्रपट निर्मात्यांनी ऐतिहासिक चित्रपटाद्वारे राष्ट्राभिमान जागृत केला.[६२] ऐतिहासिक चित्रपटाद्वारे राष्ट्रप्रेम निर्माण करण्याचे कार्य बाळासाहेब यादव, व्ही. शांताराम, भालचंद्र पेंढारकर व कोल्हापूरातील इतर चित्रपट निर्मात्यांनी केले. कोल्हापूरात निर्माण झालेल्या ऐतिहासिक चित्रपटांची संख्या एकोणीस इतकी आहे.

ऐतिहासिक चित्रपट :

या चित्रपटात प्रामुख्याने शिवाजी महाराज व त्याचे शूर सरदार यांच्या कथा असणारे सर्वात जास्त चित्रपट निर्मित झाले. " सिंहगड " हा तानाजी मालुसरे या शिवाजी महाराजांच्या शूर सरदाराची कथा असणारा चित्रपट १९२३ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने प्रस्तुत केला.[६३] तानाजी हा पराक्रमी सरदार कोंढाणा किल्ला सर करण्याच्या मोहिमेवर

धाडला जातो. स्वत:च्या प्रपंचाची पर्वा न करता तो किल्ला काबीज करतो व हुतात्मा होतो, अशा आशयाचे कथानक असलेला चित्रपट याच नांवाने " प्रभात फिल्म कंपनी " ने १९३३ साली प्रस्तुत केला. स्वराज्यासाठी प्राणार्पण करणा-या शूर मावळ्यांची ही कथा होती.[६४]

" कल्याणचा खजिना " हा चित्रपट " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२४ साली सादर केला.[६५] कल्याणचा सुभेदार बेमुहरतुलाचा खजिना विजापूरच्या बादशहाकडे पाठवितो व ही बातमी महाराजांना कळाल्यामुळे त्यांनी त्यावर छापा घालण्याचे ठरवितात. कल्याणचा खजिना महाराजांच्या हाती आला. सुभेदारही पकडला जातो. कल्याणच्या सुभेदाराची पत्नी त्यांच्या बरोबरच असते व ती एका पेटा-यात लपून बसते. पेटारा उघडल्यावर शिवाजी महाराज तिची व तिच्या पतीची भेट घडवून त्या दोघांना सन्मानाने रवाना करतात. शिवाजी महाराजांच्या स्त्री दाक्षिण्याचे दर्शना घडविणारा हा चित्रपट होता.[६६]

ऐतिहासिक चित्रपटांच्या शृंखलेतील " शहाला शह " हा राजे शहाजी यांच्यावरील चित्रपट १९२५ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने काढला. विजापूरच्या राज्यात शिवाजीने धुमाकूळ चालविलेला असतो. शहाजीला कैद करून विजापूरचा सुलतान शिवाजीला धमकीवजा खलिता पाठवितो, शहाजी राजांना भिंतीत चिणून ठार मारण्याचे ठरवितो, पण शिवाजी मोठ्या युक्तीने शहाजींची सुटका करतो.[६७]

१९२७ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने " नेताजी पालकर " हा चित्रपट निर्मित केला. या चित्रपटाचे कथानक, नेताजी पालकरांच्या जीवनातील कोणत्या प्रसंगावर होते याचा उल्लेख संदर्भ साधनात उपलब्ध होत नाही. तरीदेखील शिवाजी महाराज कोठे आहेत हे विचारण्यासाठी मोगल सरदाराकडून नेताजी पालकरचा होणारा छळ, व्यंकोजी वाघ व नेताजी यांच्यातील खंजिराच्या लढाईची दृश्ये चित्रित करण्यात आली होती.[६८]

" महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२९ ला शिवाजींचा शूर सरदार बाजीप्रभू देशपांडे यांच्या जीवनावरील " बाजी देशपांडे " हा चित्रपट काढला.[६९] याच नावाचा चित्रपट १९३९ साली " महाराष्ट्र पिक्चर्स " ने निर्मित केला.[७०] शिवाजी महाराजांना पकडण्यासाठी मोगल बादशहा सैन्य धाडतो. महाराज पन्हाळगडाच्या आश्रयाला जातात, तोपर्यंत मोंगल सैन्य पावनखिंडीत थोपवून धरण्याचे काम बाजीप्रभू देशपांडे हा शूर सरदार करतो. महाराज गडावर पोहचल्यावर तोफांचा आवाज होतो व मगच बाजी आपले प्राण सोडतो.[७१]

वीर शिवाजीच्या पराक्रमाचे चित्रण असलेला " उदयकाल " हा चित्रपट " प्रभात फिल्म कंपनी " ने १९30 साली काढला.[७२] शिवाजीने अगदी लहान वयात मावळ्यांच्या मदतीने तोरणा किल्ला जिंकला व स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली, असे कथानक असणाऱ्या या चित्रपटात शिवाजीनी लढाईत केलेला पराक्रम, बेफाम घोडदौड याचे स्फूर्तीदायक चित्रण केले गेले.[७३]

शिवाजी महाराजांच्या शूर शिलेदाराच्या शौर्याचे कथानक असणारा " स्वराज्याच्या सीमेवर " हा चित्रपट १९३७ साली " प्रिन्स शिवाजी सिनेटोन " ने निर्माण केला.[७४] शिवाजीचा राया हा शिलेदार देवगावला महाराज येणार म्हणून स्वागताची तयारी करतो. पण महाराज जेथे मुक्काम करणार असतात, ते देऊळ उडवून देण्याचा कट सुभान करतो. तो निजामशहाच्या दरबारी असतो. या कटाचा शेवट करण्यासाठी राया आत्मसमर्पण करतो व सुभानलाही ठार करतो.

शिवाजी महाराजांच्या शूर सरदारांपैकी " बहिर्जी नाईक " यांची कथा असणारा चित्रपट " प्रभाकर पिक्चर्स " ने १९४३ ला निर्मित केला. शिवाजीनी तोरणा सर केल्यानंतर त्यांना जिवंत वा मृत पकडून आणण्याचे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वचन बाजी मोरे हा विजापूरच्या सरदाराला देतो, पण दौलत हे सर्व कारस्थान उघडकीस आणतो. तेंव्हापासून सर्वजण त्याला बहिर्जी नाईक या नांवाने ओळखू लागतात.[७६] सर्जेराव या तरुणाने तोरणा किल्ला काबीज करण्यासाठी प्राणाचीही पर्वा केली नाही. मराठ्यांच्या इतिहासात आपले नांव उज्वल केले असे कथानक असणारा " जय भवानी " हा चित्रपट " प्रभाकर पिक्चर्स " ने १९४७ साली सादर केला.[७७]

" शिलंगणाचं सोनं " या १९४९ ला " प्रभाकर पिक्चर्स " ने दाखविलेल्या चित्रपटाद्वारे एका शूर सरदार कन्येची कथा दर्शविण्यात आली. फितूर सरदार स्वराज्य स्थापनेला खीळ घालण्याचा प्रयत्न करतात, पण शूर सरदार कन्येच्या लक्षात ही गोष्ट येते. शिवाजीचे शूर शिलेदार हा डाव उधळून टाकतात.[७८]

ऐतिहासिक व्यक्तिरेखेवरील " सती पद्मीनी " हा चित्रपट १९२४ साली व " राणा हमीर " हा चित्रपट " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२५ साली निर्मित केला.[७९] चितोडच्या शूर व पराक्रमी " राणा हमीर " या राजाच्या जीवनातील नेमक्या कोणत्या प्रसंगाचे चित्रण केले गेले, याचा उल्लेख मात्र संदर्भ साधनात उपलब्ध नाही. १९३१ साली याच संस्थेने " राणी रुपमती " या ऐतिहासिक चित्रपटाची निर्मिती केली. मांडुगडचा राजा बाजबहाद्दूर हा मोंगलाशी झालेल्या युध्दात मारला जातो व हे कळताच त्याची राणी रुपमती ही देखील आपले प्राण सोडते. या ऐतिहासिक घटनेवर आधारित चित्रपट चित्रित करण्यात आला.[८०]

" मराठ्यातील दुही " हा ऐतिहासिक चित्रपट १९३२ साली " छत्रपती सिनेटोन " ने निर्मिला. संभाजीच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजांच्यावर राज्याची जबाबदारी पडली. त्यांना संताजी घोरपडे या शूर सरदाराने रायगडाहून सुरक्षितपणे जिंजीला पोहोचविले. पण

विद्रोही सूर्याजी पिसाळने राजाराम महाराजांचे कान फुंकल्याने संताजीला देहांताची शिक्षा झाली. नंतर मात्र सत्य कळाल्यावर एक निष्ठावान सरदार गमावल्याचे राजाराम महाराजांना दुःख झाले.[८१] मराठ्यातील फुटीमुळे राज्याचे जे नुकसान झाले, त्याचे दर्शन या चित्रपटातून होते.

काल्पनिक ऐतिहासिक चित्रपट :

या भागात " प्रभात फिल्म कंपनी " ने १९३२ साली तयार केलेला " अग्निकंकण " या चित्रपटाचा समावेश होतो. या चित्रपटाचा आशय असा की, वैजयंती या राज्याचा दुष्ट सेनापती राज्यात क्रांती घडवून राजाचा खून करतो. वीरमती ही राणी पुत्रासह जंगलाचा आसरा घेते. राजपुत्र एकवीस वर्षानंतर राज्य परत मिळविण्याचा निश्चय करून राज्यात परततो. अमात्य कन्येची व त्याची भेट होते व राजपुत्र सेनापतीचा लढाईत पराभव करतो, त्यामुळे त्याला त्याचे राज्य परत मिळते व अमात्य कन्येशी तो विवाहबध्द होतो. अशा रितीने राजपुत्राच्या पराक्रमाचे चित्रण या चित्रपटात केले आहे.[८२] " शालिनी सिनेटोन " ने १९३७ साली सादर केलेल्या " प्रतिभा " या चित्रपटात एका कवीच्या पत्नीचे नांव प्रतिभा असते. राजकवी त्याचे काव्य आपलेच आहे म्हणून ऐकवितो व दरबाराकडून वाहवा मिळवितो. पण प्रतिभा आपली बाजू राजासमोर मांडते असे कथानक घेतले गेले.[८३]

या वर्गवारीतील पुढील चित्रपट " ज्वाला " हा " हंस पिक्चर्स " ने १९३८ साली प्रस्तुत केला. या चित्रपटातही कृतघ्न सेनापतीचेच कथानक घेण्यात आले. अंगार नावाचा सेनापती राजा होण्याची महत्वकांक्षा बाळगून असतो. तो राजावर विषप्रयोग करून राजपुत्राकडे मोर्चा वळवितो. पण अंगारची पत्नी राजनिष्ठा प्रकट करते व इथे अंगारचा शेवट होतो.[८४] राजद्रोहाची शिक्षा किती भयानक असते, हे या चित्रपटाद्वारे दाखविण्यात आले.

## मनोरंजनात्मक चित्रपट :

या सदराखालील चित्रपटात अद्‌भुतरम्य चित्रपट, काल्पनिक कथा असणारे चित्रपट यांचा समावेश होतो.

राजाराणीचे काल्पनिक कथानक घेऊन १९30 साली " प्रभात फिल्म कंपनी " ने " रानीसाहिबा " हा चित्रपट चित्रित केला. या बाल चित्रपटात राजा बावळट असल्याने राणी सर्व सत्ता आपल्या हातात घेते व दिवाणाच्या कारस्थानापासून राज्याचे रक्षण करते.[८५]

अद्‌भुतरम्य चित्रपटात " निशा सुंदरी " [ मिडनाईट गर्ल [ हा चित्रपट " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२९ ला निर्मित केला.[८६] सिंड्रेलाच्या अद्‌भुतरम्य कथेवर हा चित्रपट काढला गेला.[८७] यावरून यात सिंड्रेलाची सावत्र आई, तिच्याकडून होणारा सिंड्रेलाचा छळ व राजपुत्राशी अखेर तिचा विवाह या गोष्टी असणारा, हा निष्कर्ष काढता येतो. [redacted]

" राष्ट्र सिनेटोन " ने १९३७ साली " जादुगारिण " हा चित्रपट प्रस्तुत केला.[८८] त्याचे कथानक संदर्भ साधनात उपलब्ध नसले तरी नावावरून हा चित्रपट अद्‌भुतरम्य असावा, असा ढोबळ निष्कर्ष निघतो.

त्याचप्रमाणे कोल्हापूरात १९३२ साली " आनंद पिक्चर्स " ने " प्रेमसंगम ", " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९३१ साली व १९३२ साली " दुष्मन की रात " व " किस्मत " या चित्रपटांची निर्मिती केली.[८९] या चित्रपटांच्या कथांची माहिती उपलब्ध संदर्भ साधनात मिळत नाही.

अशा रितीने कोल्हापूरातील चित्रपट संस्थांनी कोल्हापूरात १९१९ ते १९४९ या तीस वर्षात चौ-याहत्तर चित्रपटांची निर्मिती केली. या

काळात एकूण अठरा संस्थांनी चित्रपट निर्मित केले. यात सर्वात जास्त चित्रपट " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने सादर केले. त्यांची संख्या तेवीस इतकी आहे. " प्रभात फिल्म कंपनी " ने अकरा तर " हंस पिक्चर्स " ने सात चित्रपट सादर केले. " शालिनी सिनेटोन " व " प्रभाकर पिक्चर्स " ने प्रत्येक पाच चित्रपटांची निर्मिती केली, तर " कोल्हापूर सिनेटोन " ने चार चित्रपट निर्मिले. " न्यू हंस पिक्चर्स " व " प्रफुल्ल पिक्चर्स " चे प्रत्येकी तीन व " छत्रपती सिनेटोन " आणि " प्रभा चित्र " ने प्रत्येकी दोन चित्रपट प्रस्तुत केले. त्याचप्रमाणे " प्रिन्स शिवाजी सिनेटोन ", " सम्राट सिनेटोन ", " राष्ट्र सिनेटोन ", " आनंद पिक्चर्स ", " महाराष्ट्र पिक्चर्स ", " प्रगती पिक्चर्स ", " माय पिक्चर्स " , " शाम सिनेटोन " व " मंगल पिक्चर्स " या चित्रपट संस्थांनी प्रत्येकी एक चित्रपट निर्मिला.

१९३२ ते १९४९ या काळातील कोल्हापूर, मुंबई, पुणे, सांगली व नासिक येथील चित्रपटांच्या आशयांचा तुलनात्मक अभ्यास करता त्यात बरेचसे साम्य आढळते. कोल्हापूरात वर नमूद केल्याप्रमाणे पौराणिक चित्रपटात महाभारतातील कथांवर जास्त चित्रपट निघाले. त्याचप्रमाणे पुणे, मुंबई येथे - देखील याच विषयांवर जास्त चित्रपटांची निर्मिती झाली. सांगली येथेदेखील महाभारतातील कथेवर एका चित्रपटाची निर्मिती झाली. नासिक मध्ये निघालेला चित्रपट मात्र शिवभक्तीवर आधारित होता.

सामाजिक चित्रपटांबाबत देखील कोल्हापूर प्रमाणे मुंबई व पुणे येथे निघालेले चित्रपट विवाह, वैवाहिक विषय व समस्या याच विषयांना अनुसरुन काढण्यात आले. सांगली येथे " विवाह " याच विषयावर एका चित्रपटाची निर्मिती झाली.

पुणे, मुंबई येथे निर्मित झालेल्या ऐतिहासिक चित्रपटात शिवाजी, त्याचे स्वराज्य स्थापनेचे प्रयत्न व त्याचे सरदार याच विषयावरील चित्रपटांची संख्या जास्त होती.

महाराष्ट्रात बोलपटांच्या काळात निर्मित झालेल्या चित्रपटांत सामाजिक चित्रपटांची संख्या जास्त असली तरी, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात निर्माण झालेल्या सर्व मूकपट व बोलपटांचा विचार करता, बहुतांशी चित्रपट हे धार्मिक आशयाचे होते. त्यानंतर सामाजिक व ऐतिहासिक असा चित्रपटांचा क्रम लागतो. कोल्हापूर चित्रसृष्टीत - देखील हेच सुत्र दिसते.

संदर्भग्रंथ व तळटीपा :


१] भिडे ग. रं., बाबा गजबर, कलामहर्षि बाबूराव पेंटर, पृ. १६९, १७०.

२] संपादक सुधीर फडके, चित्रशारदा, पृ. ५, १७.

३] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७०, १७१.

४] कित्ता, पृ. १५३.

५] व्ही. शांताराम, शांतारामा, पृ. ९२

६] संपादक वसंत साठे, चित्रसंपदा, पृ. १३.

७] संपादक सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ७

८] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६०.

९] संपादक सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३

१०] कित्ता, पृ. ४.

११] पुराणानुसार चार युगे : सत्ययुग, व्यापारयुग, त्रेतायुग व कलियुग.

१२] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ८

१३] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६९.

१४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ४

१५] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १२४

१६] कित्ता, पृ. १७२.

१७] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ७.

१८] कित्ता, पृ. १९

१९] संपा. बाळासाहेब पाटील, साप्ता. सत्यवादी, दि. ९. ३. ३८, पृ. १३

२०] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १४.

२१] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७१.

२२] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. १७२.

२३] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १.

२४] किता, पृ. ३
२५] किता, पृ. ७
२६] किता, पृ. ११
२७] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २०
२८] किता, पृ. २०
२९] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २०
३०] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६९
३१] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २५
३२] किता, पृ. २५
३३] किता, पृ. ११
३४] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १६
३५] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १२
३६] किता, पृ. ४
३७] किता, पृ. १३
३८] किता, पृ. १७
३९] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १९
४०] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १९
४१] किता, पृ. १९
४२] किता, पृ. २६
४३] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २५
४४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २९
४५] पेंढारकर भालजी, साधा माणूस, पृ. २३९
४६] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३२
४७] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ४

४८] कित्ता, पृ. ९

४९] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २५

५०] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २९

५१] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १३८

५२] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १०

५३] श्री. अनंत माने यांची मुलाखत.

५४] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. २८४

५५] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २९

५६] पेंढारकर बाबूराव, चित्र आणि चरित्र, पृ. १४८

५७] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १७

५८] कित्ता, पृ. ३७

५९] कित्ता, पृ. ३१

६०] कित्ता, पृ. ७

६१] कित्ता, पृ. ३३

६२] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ६८

६३] कित्ता, पृ. १७०

६४] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७३

६५] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७०

६६] महाराष्ट्र फिल्म कंपनीची जाहिरात पुस्तिका.

६७] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ७४

६८] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १५८

६९] कित्ता, पृ. १७१

७०] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १८

७१] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १६

७२] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७२

७३] कितता, पृ. १०५

७४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ४

७५] कित्ता, पृ. १३

७६] कित्ता, पृ. २८

७७] कित्ता, पृ. ३२

७८] कित्ता, पृ. ३९

७९] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ७४

८०] भेंडारकर भालजी, उपरोक्त, पृ. ७८, ८१

८१] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १

८२] कित्ता, पृ. १

८३] कित्ता, पृ. १२

८४] कित्ता, पृ. १४

८५] श्री. अनंत माने यांची मुलाखत

८६] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७१

८७] कित्ता, पृ. १६३.

८८] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १५

८९] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७२, १७७.